इंग्रज कालीन गोलमेज परिषदा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर

प्रा. डॉ. योगेश मारोती करवाडे
स्व. नि. पा. वाघाये कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लाखनी, भंडारा
मो. नं. 9423671456
Email ID - avniayush5@gmail.com

Crossref DOI -

गोषवारा :

इ.स. १९३० ते १९३२ या काळात लंडन येथे तीन गोलमेज परिषदा आयोजित करण्यात आले. या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भूमिकेचा अभ्यास करणे गरजेचे आहे. भारताच्या भावी घटनात्मक व्यवस्थेवर चर्चा करण्यासाठी ब्रिटिश सरकारने या परिषदा आयोजित केल्या होत्या. या परिषदांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वंचित घटक आणि अस्पृश्य समाजाचे प्रतिनिधित्व करून त्यांच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक हक्कांचा प्रश्न प्रभावीपणे मांडला. या संशोधनात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राजकीय प्रतिनिधित्व, स्वतंत्र मतदारसंघ, कायदेमंडळातील प्रतिनिधित्व, सरकारी नोकऱ्यांमधील संधी आणि सामाजिक समानता यांसाठी केलेल्या मागण्यांचा अभ्यास केला आहे. पहिल्या गोलमेज परिषदेत त्यांनी वंचित घटक आणि अस्पृश्य समाजाच्या राजकीय हक्कांना घटनात्मक संरक्षण मिळावे, यावर भर दिला. दुसऱ्या गोलमेज परिषदेत स्वतंत्र मतदारसंघाच्या प्रश्नावर त्यांची भूमिका अधिक ठामपणे पुढे आली. गोलमेज परिषदांच्या प्रक्रियेतून पुढे आले ला जातीय निवाडा आणि १९३२ चा पुणे करार यांचाही या संशोधनात महत्त्वपूर्ण संदर्भ आहे. स्वतंत्र मतदारसंघाच्या प्रश्नावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा गांधी यांच्यात मतभेद झाले. त्यानंतर झालेल्या पुणे करारामुळे स्वतंत्र मतदारसंघाऐवजी राखीव जागांच्या माध्यमातून प्रतिनिधित्वाची व्यवस्था करण्यात आली. एकूणच, इंग्रजांनी लंडन येथे आयोजित केलेल्या तीन गोलमेज परिषदांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वंचित घटक आणि अस्पृश्य समाजाच्या समस्या आंतरराष्ट्रीय राजकीय व्यासपीठावर मांडण्याचा प्रयत्न केला आणि भारतीय घटनात्मक सुधारणांच्या चर्चेत सामाजिक न्याय व राजकीय प्रतिनिधित्वाचा मुद्दा ठळकपणे पुढे आणला. त्यांच्या सहभागातून वंचित घटक आणि अस्पृश्य समाजाच्या हक्कांसाठी घटनात्मक मार्गाने संघर्ष करण्याची दिशा स्पष्ट झाली.

प्रस्तावना :

गोलमेज परिषद म्हणजे ही एक अनेक राजकीय पक्ष एकत्रित येऊन चर्चा करण्याचा वैचारिक मंच होय. पूर्वी गोलाकार (वर्तुळाकार) आकाराच्या मेजाभोवती बसून राजकीय पक्ष समाजाचा सामाजिक, राजकीय आणि आर्थिक विकास करण्यासाठी एकत्रित येत असत. त्यामुळे त्याला गोलमेज असे नाव पडले असावे .यामध्ये कोणालाही मेजाच्या मध्यभागी किंवा कोपऱ्यात बसल्याने आपले महत्त्व कमी अधिक आहे असे समजू नये म्हणून

यासाठी गोल (वर्तुळाकार) आकाराची मेज वापरली जात असे. ब्रिटिश भारताच्या घटनात्मक आणि राजकीय इतिहासामध्ये गोलमेज परिषदा या एक महत्त्वपूर्ण घटना म्हणून ओळखल्या जातात. भारतातील घटनात्मक सुधारणांचा आराखडा तयार करण्यासाठी इंग्रज सरकारने इ.स. 1930 ते 1932 या काळात लंडन येथे तीन गोलमेज परिषदा आयोजित केल्या. या परिषदांमध्ये भारताच्या भावी राज्यव्यवस्थेच्या प्रतिनिधित्वचा, अल्पसंख्यांकांच्या हक्कांचा आणि सामाजिक दृष्ट्या वंचित घटक आणि अस्पृश्य समाजाच्या राजकीय प्रतिनिधित्वांचा विचार करण्यात आला. या प्रक्रियेत विविध भारतीय राजकीय व सामाजिक गटांच्या मागण्या इंग्रज सरकार पुढे मांडल्या गेल्या. या परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्य समाजाचे प्रतिनिधित्व केले. त्यांनी सामाजिक विषमता, जातीय भेदभाव आणि राजकीय प्रतिनिधित्व या प्रश्नांना घटनात्मक चौकटीत मांडण्याचा प्रयत्न केला. अस्पृश्य समाजाला स्वतंत्र राजकीय प्रतिनिधीत्व, मताधिकार आणि शासन व्यवस्थेत प्रभावी सहभाग मिळावा यासाठी त्यांनी आपली भूमिका ठामपणे मांडली. त्यांच्या मते सामाजिक दृष्ट्या वंचित घटकाला केवळ कायदेशीर समानता पुरेशी नाही, तर राजकीय सत्तेत सहभागी करून घेणे आवश्यक आहे. गोलमेज परिषदेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सहभाग हा त्यांच्या सामाजिक आणि राजकीय विचारांच्या विकासातील महत्त्वाचा टप्पा मानला जातो. या परिषदेतील चर्चा, त्याची मांडणी आणि त्यानंतर घडलेल्या राजकीय घटनांचा भारतीय संविधानाच्या निर्मितीपूर्व सामाजिक, राजकीय प्रक्रियेवरही प्रभाव पडला. त्यामुळे गोलमेज परिषदांचा अभ्यास हा केवळ इंग्रजकालीन घटनात्मक सुधारणांच्या संदर्भात न राहता अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांचा संघर्ष आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सामाजिक न्यायाच्या विचारांच्या संदर्भात करणे आवश्यक ठरते.

सदर संशोधन पेपरमध्ये गोलमेज परिषदांची पार्श्वभूमी, तीनही परिषदांमधील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका, स्वतंत्र मतदारसंघाचा प्रश्न, गांधी-आंबेडकर मतभेद, कम्युनल अवॉर्ड आणि पुणे करार यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

की-वर्ड्स :

गोलमेज परिषद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, इंग्रज सरकार, वंचित घटक,अस्पृश्य वर्ग, स्वतंत्र मतदारसंघ, राजकीय प्रतिनिधित्व, कम्युनल अवॉर्ड, पुणे करार.

संशोधनाची उद्दिष्टे :

सदर संशोधनाची प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे मांडण्यात आलेली आहेत.

1. गोलमेज परिषदेतील ऐतिहासिक पार्श्वभूमी स्पष्ट करणे.
2. तीनही गोलमेज परिषदांमध्ये डॉ. आंबेडकर यांच्या सहभागाचा अभ्यास करणे.
3. वंचित घटक आणि अस्पृश्य समाज यांच्या राजकीय प्रतिनिधित्वाबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका समजून घेणे.
4. स्वतंत्र मतदारसंघाच्या मागणीचे स्वरूप आणि महत्त्व स्पष्ट करणे.
5. कम्युनल अवॉर्ड आणि पुणे कराराच्या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

Research Hub International Journal

6. स्वतंत्र भारताच्या संविधाननिर्मितीच्या प्रक्रियेत या घटनांचा संबंध स्पष्ट करणे.

संशोधन पद्धती :

सदर संशोधन पेपरसाठी ऐतिहासिक आणि विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लेखन व भाषणे, सरकारी दस्तऐवज, महाराष्ट्र शासनाने प्रकाशित केलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लेखन-साहित्य, तसेच गोलमेज परिषदांवरील उपलब्ध ऐतिहासिक संदर्भ यांचा आधार घेण्यात आला आहे.

गोलमेज परिषदांची पार्श्वभूमी :

लंडन येथे झालेल्या तीन गोलमेज परिषदांचा मुख्य उद्देश भारताच्या भावी घटनात्मक व्यवस्थेवर चर्चा करणे हा होता. या परिषदा लंडनमध्ये तीन टप्प्यांत झाल्या -

पहिली गोलमेज परिषद ही इ.स. १९३०–१९३१ मध्ये झाली. यात काँग्रेसचा सहभाग नव्हता. दुसरी गोलमेज परिषद ही इ.स. १९३१ मध्ये झाली. यात महात्मा गांधी काँग्रेसचे प्रतिनिधी म्हणून सहभागी झाले होते आणि तिसरी गोलमेज परिषद ही इ.स १९३२ मध्ये झाली. यात काँग्रेस पक्षाचा सहभाग नव्हता. पहिली गोलमेज परिषद ही १२ नोव्हेंबर १९३० ते १९ जानेवारी १९३१ या काळात झाली. काँग्रेस पक्षाने या परिषदेवर बहिष्कार टाकला होता. मात्र या गोलमेज परिषदेत विविध भारतीय राजकीय, सामाजिक आणि संस्थानिक प्रतिनिधी सहभागी झाले होते.

पहिली गोलमेज परिषद आणि डॉ. आंबेडकर :

लंडन येथे झालेल्या पहिल्या गोलमेज परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वंचित घटक आणि अस्पृश्य समाजाचे प्रतिनिधित्व केले. त्या वेळी भारतीय राज्यघटनेची भावी रचना, संघराज्य व्यवस्था, प्रांतिक शासन आणि अल्पसंख्याकांचे अधिकार यांसारख्या विषयांवर चर्चा झाली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दृष्टीने भारताला स्वराज्य मिळणे महत्त्वाचे असले, तरी त्या स्वराज्यात वंचित घटक आणि अस्पृश्य समाजाला समान राजकीय अधिकार मिळणार आहेत का? हा प्रश्न अधिक महत्वाचा होता. त्यांच्या मांडणीचा केंद्रबिंदू असा होता की, सामाजिकदृष्ट्या वंचित आणि अस्पृश्य असलेल्या समाजाला राजकीय संरक्षणाशिवाय वास्तविक समानता प्राप्त होऊ शकणार नाही.

द्वितीय गोलमेज परिषद आणि डॉ. आंबेडकर :

द्वितीय गोलमेज परिषद ही इ.स. १९३१ मध्ये सप्टेंबर ते डिसेंबर महिन्यात झाली आणि याच काळात गांधी-आयर्विन यांच्यात करार झाला. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने द्वितीय गोलमेज परिषदत सहभाग नोंदवला आणि महात्मा गांधी काँग्रेसचे प्रतिनिधी म्हणून परिषदेत सहभागी झाले.

Research Hub International Journal

द्वितीय गोलमेज परिषदेतील सर्वाधिक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे अल्पसंख्याकांचे राजकीय प्रतिनिधित्व, मुस्लिम, शीख, ख्रिश्चन, अँग्लो-इंडियन आणि इतर समूहांच्या प्रतिनिधित्वाबरोबरच अस्पृश्य वर्गांच्या राजकीय हक्कांवरही चर्चा झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्य वर्गांना स्वतंत्र राजकीय प्रतिनिधित्व मिळावे, अशी भूमिका मांडली. त्यांच्या मते सामाजिकदृष्ट्या ज्यांना बहुसंख्याक हिंदू समाजाच्या सत्ताकेंद्रांपासून पिढया दर पिढया दूर ठेवण्यात आले होते, त्यांना केवळ संयुक्त मतदारसंघात समाविष्ट केल्याने पुरेसे प्रतिनिधित्व मिळेलच असे नाही. याच मुद्द्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा गांधी यांच्यात मतभेद निर्माण झाले. महात्मा गांधी अस्पृश्यांना हिंदू समाजापासून वेगळे मानत नव्हते म्हणून त्यांचा या मागणीला विरोध होता, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर राजकीय प्रतिनिधित्वाच्या स्वतंत्र मुद्द्यावर भर देत होते. या मतभेदांची नोंद गोलमेज परिषदेच्या चर्चांमध्ये आढळते.

स्वतंत्र मतदारसंघाचा प्रश्न :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राजकीय विचारांमध्ये प्रतिनिधित्वाला विशेष महत्त्व होते. अस्पृश्य समाजाला विधानमंडळात स्वतंत्र आणि प्रभावी आवाज मिळावा यासाठी त्यांनी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी केली. ही मागणी केवळ निवडणूक पद्धतीशी संबंधित नव्हती, तर तिच्यामागे सामाजिक, राजकीय सत्तासंबंधांचा प्रश्न होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारानुसार सामाजिक विषमता आणि जातीय भेदभाव कायम असताना राजकीय लोकशाही प्रभावी होण्यासाठी वंचित आणि अस्पृश्य समाजाला संस्थात्मक संरक्षण आवश्यक होते.

द्वितीय गोलमेज परिषदेत अल्पसंख्याकांच्या प्रतिनिधित्वावर एकमत झाले नाही. त्यानंतर ब्रिटिश प्रधानमंत्री रॅमसे मॅक्डोनाल्ड यांनी इ.स. १९३२ मध्ये कम्युनल अवॉर्ड जाहीर केला. त्यामध्ये डिस्प्रेड क्लासेस यांच्यासाठी स्वतंत्र मतदारसंघाची घोषणा करण्यात आली होती.

कम्युनल अवॉर्ड आणि पुणे करार :

कम्युनल अवॉर्डनंतर महात्मा गांधींनी अस्पृश्य समाजासाठी स्वतंत्र मतदारसंघाच्या घोषणेला विरोध केला आणि पुणे येथील येरवडा तुरुंगात प्राणांतिक उपोषण सुरू केले. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि इतर नेत्यांमध्ये वाटाघाटी झाल्या. २४ सप्टेंबर १९३२ रोजी पुणे करार झाला. या करारामुळे अस्पृश्य समाजाला स्वतंत्र मतदारसंघाऐवजी संयुक्त मतदारसंघाच्या चौकटीत राखीव जागांची व्यवस्था करण्यात आली. पुणे कराराचे मूल्यमापन करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूळ स्वतंत्र मतदारसंघाच्या मागणीचा आणि त्यानंतर स्वीकारलेल्या संयुक्त मतदारसंघातील आरक्षणाचा संदर्भ लक्षात घेणे आवश्यक आहे.

तिसरी गोलमेज परिषद :

तिसरी गोलमेज परिषद इ.स. १९३२ मध्ये, १७ नोव्हेंबर ते २४ डिसेंबर या कालावधीत झाली. या परिषदेत काँग्रेस पक्षाचा सहभाग नव्हता. या पुर्वीच्या परिषदांमधील चर्चांच्या आधारे पुढील घटनात्मक सुधारणांची प्रक्रिया सुरू राहिली. गोलमेज परिषदांच्या चर्चांचा पुढील घटनात्मक प्रक्रियेवर परिणाम झाला आणि शेवटी Gov. of India Act, 1935 अस्तित्वात आला. या कायद्यात प्रांतिक स्वायत्ततेसारख्या महत्त्वाच्या घोषणा मान्य करण्यात

आल्या.

डॉ. आंबेडकरांच्या भूमिकेचे विश्लेषण :

इंग्रज सरकारने लंडन येथे आयोजित केलेल्या गोलमेज परिषदांमधील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका पुढील मुद्द्यांमधून स्पष्ट होते.

राजकीय प्रतिनिधित्व :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वंचित आणि अस्पृश्य समाजाला राजकीय प्रक्रियेत प्रभावी प्रतिनिधित्व मिळावे यावर भर दिला.

सामाजिक न्याय :

त्यांच्या मते राजकीय स्वातंत्र्याबरोबर सामाजिक समानता आवश्यक होती. जातीय विषमता दूर केल्याशिवाय लोकशाहीची उद्दिष्टे पूर्ण होणार नाहीत, हा त्यांच्या राजकीय विचारांचा महत्त्वाचा भाग होता.

संविधानिक संरक्षण :

बहुसंख्याकांच्या राजकीय इच्छेवर वंचित आणि अस्पृश्य समाजाचे अधिकार अवलंबून राहू नयेत, यासाठी संविधानिक संरक्षण आवश्यक असल्याचे त्यांच्या भूमिकेतून दिसते.

लोकशाहीची व्यापक संकल्पना :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसाठी लोकशाही ही केवळ मतदानाची पद्धत नव्हती. समान नागरिकत्व, प्रतिनिधित्व आणि मूलभूत अधिकार यांच्याशी तिचा संबंध होता.

गोलमेज परिषदांचे ऐतिहासिक महत्त्व :

लंडन येथे आयोजित केलेल्या गोलमेज परिषदांमुळे भारताच्या घटनात्मक भवितव्याविषयी विविध भारतीय समूहांचे प्रश्न ब्रिटिश सरकारसमोर औपचारिकरीत्या मांडले गेले. या प्रक्रियेत अल्पसंख्याक, वंचित आणि अस्पृश्य समाजाच्या प्रतिनिधित्वाचा प्रश्न केंद्रस्थानी होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या व्यासपीठाचा उपयोग अस्पृश्य समाजाच्या राजकीय हक्कांची मांडणी करण्यासाठी केला. त्यामुळे त्यांच्या नेतृत्वाला भारताच्या बाहेरही घटनात्मक आणि राजकीय संदर्भ प्राप्त झाला.

निष्कर्ष :

इंग्रज कालीन लंडन येथे आयोजित गोलमेज परिषदांचा अभ्यास करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची

भूमिका स्वतंत्रपणे समजून घेणे आवश्यक आहे. त्यांनी भारताच्या स्वातंत्र्याच्या प्रश्नाबरोबरच स्वातंत्र्यानंतरच्या समाजव्यवस्थेत वंचित आणि अस्पृश्य समाजाला समान राजकीय स्थान मिळावे, यावर भर दिला. स्वतंत्र मतदारसंघाची मागणी, कम्युनल अवॉर्ड आणि पुणे करार या घटनांमधून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राजकीय विचारांची दिशा स्पष्ट होते. त्यांच्यासाठी राजकीय सत्ता ही सामाजिक परिवर्तनाचे साधन होते. पुढे भारतीय संविधानाच्या निर्मितीत त्यांनी बजावलेल्या भूमिकेच्या पार्श्वभूमीवर गोलमेज परिषदांमधील त्यांचा सहभाग हा त्यांच्या घटनात्मक विचारांच्या विकासातील महत्त्वाचा टप्पा मानता येतो.

अशा प्रकारे, गोलमेज परिषदांचा इतिहास हा केवळ इंग्रज सरकार आणि भारतीय राष्ट्रीय चळवळीतील वाटाघाटींचा इतिहास नसून, भारतातील वंचित आणि अस्पृश्य समाजाला आपल्या राजकीय हक्कांसाठी केलेल्या घटनात्मक संघर्षाचाही इतिहास आहे.

संदर्भ ग्रंथसूची :

- प्रा. खरात, विलास :- डॉ. बाबासाहेब आंबेडकर विरुद्ध गांधी, प्रकाशक - डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटर नवी दिल्ली - 5, प्रथम आवृत्ती, 24 सप्टें. 2014, पृष्ठ क्र. 53, 54.
- डॉ. कठारे, अनिल, डॉ. महादेव - महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीचा इतिहास (इ.स. 1891 वाघमारे, डॉ. गौतम पाटील ते 1994), चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती 15 ऑगस्ट 2009, पृष्ठ क्र. 141, 142, 152, 163, 169, 171, 172, 174, 175.
- प्रा. खरात, विलास (संपा.) :- गांधीजी एक दगाबाज व पाखंडी राजकारणी - डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रकाशक मूलनिवासी पब्लिकेशन ट्रस्ट, पुणे, तृतीय आवृत्ती, 2015, पृष्ठ क्र. 128, 129.
- डॉ. जाधव, नरेंद्र - प्रज्ञासुर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर समग्र वैचारिक चरित्र, ग्रंथाली प्रकाशन मुंबई, प्रथम आवृत्ती, 2 फेब्रुवारी 2014, पृष्ठ क्र. 154, 155, 160, 176, 177, 200, 201, 202.
- महाराष्ट्र विश्वकोश - "गोलमेज परिषद".
- महाराष्ट्र विश्वकोश - "पुणे करार".

Research Hub International Journal